# घटक 1 : प्रारंभिक काळ

## अ. बाळशास्त्री जांभेकर

**प्रास्ताविक**

भारतातील प्रबोधनाचा पाया घालणारे आद्य विचारवंत म्हणून जांभेकर यांना इतिहासात मानाचे स्थान आहे. त्यांनी विचार, लेखन व कृती अशा तीनही स्तरांवर मोठे काम केले. त्यामुळेच त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे पितामह म्हणून ओळखले जाते पेशवाईच्या शेवटानंतर इंग्रज काळात राजकीय क्षेत्राप्रमाणे सामाजिक व ,शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारी बदल झाले. त्यात अनेक एतद्देशीय बुद्धिवादी, विचारवंत उदयास आले त्यातील पहिल्या पिढीतील सुधारक विचारवंत होते बाळशास्त्री जांभेकर. भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील सुधारणेचा इतिहास त्यांच्या शिवाय पूर्ण होऊ शकत नाही.त्यांचे सुधारणा विषयक कार्य पुढीलप्रमाणे ...

**बाळशास्त्रींचा जन्म, बालपण व शिक्षण -**

जांभेकर घराणे ऋग्वेदी कौशिक गोत्री कऱ्हाडे ब्राह्मण भट शाखेचे होते. हे घराणे मूळचे कऱ्हाडचे पण त्यांचे पूर्वज गोमंतकात गेले. पोर्तुगीज जाचामुळे जांभेकर घराणे साधारण १५ व्या शतकात कोकणात पोंभुर्ले गावी स्थलांतरीत झाले. जांभेकर घरांणे पोंभुर्ले गावाचे ग्रामोपाध्ये झाले. गंगाधरशास्त्री व सगुणाबाई जांभेकर यांना दोन मुले व दोन मुली अशी चार अपत्ये होतीसर्वात मोठे नारायण, त्यानंतर लाडूबाई व चिमाबाई आणि सर्वात लहान बाळशास्त्री होय. भावंडांमध्ये सर्वात लहान असलेल्या बाळशास्त्रींचा जन्म ६ जानेवारी १८१२ रोजी (पोंभुर्ले, ता. देवगड जि. सिंधुदुर्ग) झाला. बाळशास्त्री यांच्या जन्मतिथीबाबत वाद आहेत. असे असले तरी बहुतांश अभ्यासक बाळशास्त्री यांचा जन्म ६ जानेवारी १८१२ रोजीच झाला असे मानतात.

बाळशास्त्रींचा विवाह लहानपणीच झाला होता त्यांच्या पहिल्या पत्नीचे निधन १८३३ साली झाले. त्यानंतर बाळशास्त्रींनी सुंदराबाई उर्फ चिमाताई (चिमाताई या सदाशिव कृष्ण देवस्थळी यांची कन्या) यांच्याशी विवाह केला. बाळशास्त्री यांची आई सगुणाबाईचा मृत्यू १८३० (काशी) तर वडील गंगाधरशास्त्रींचा मृत्यू १८४० (पोंभुर्ले) मध्ये झाला. बाळशास्त्री यांना घरातच वडिलांकडून शिक्षण मिळाले. मराठी व संस्कृतमध्ये ते अल्पावधीत तज्ज्ञ झाले. संत साहित्य व इतिहासाचा

अभ्यास केला. वयाच्या १२ व्या वर्षांपर्यंत त्यांचा अनेक संस्कृत ग्रंथाचा अभ्यास झाला. त्यांची आकलन व स्मरणशक्ती आश्चर्यकारक होती त्यामुळे त्यांना बालबृहस्पती म्हणत.

पुढील शिक्षणासाठी १८२४-२५ मध्ये बाळशास्त्री बहिणीकडे (लाडूबाई रामशास्त्री जानवेकर) मुंबईस आले. लाडूबाईचे पती रामशास्त्री जानवेकर दी बॉम्बे नेटिव्ह स्कूल सोसायटी शाळेचे तपासनीस होते त्यामुळे त्यांच्याकडे राहून बाळशास्त्रींची बॉम्बे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कुल सोसायटीच्या शाळेत शिक्षणाची व्यवस्था झाली. बापू छत्रे (सदाशिव काशीनाथ) यांच्याकडून इंग्रजी व बापूशास्त्री शुक्ल यांच्याकडून संस्कृतचे धडे घेतले. गणित, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, मानसशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास अशा अनेक विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास होता.

बाळशास्त्रींना अनेक भाषा केवळ अवगत नव्हत्या तर त्यावर त्यांचे प्रभुत्व होते. भाषाप्रभू बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलगू, फारसी या भारतीय भाषांसह इंग्रजी, फ्रेंच, लॅटीन व ग्रीक भाषांचेही ज्ञान होते. फ्रेंच भाषेतील त्यांच्या नैपुण्याबद्दल फ्रांसच्या राजानेही त्यांचा सन्मान केला होता. प्रार्थना समाजाचे संस्थापक दादोबा पांडुरंग तरखडकर बाळशास्त्री यांचे गुरु होते. त्यांचा बाळशास्त्री वर मोठा प्रभाव होता.

अक्कलकोटला युवराज शहाजी भोसले यांचे शिक्षक म्हणून व त्यानंतर एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. गव्हर्नर एल्फिन्स्टनच्या सेवानिवृत्तीनंतर (१८२७) स्मरणार्थ त्याच्या नावाने एल्फिन्स्टन स्कूल सुरु करण्यात आले. मुंबईतील या कॉलेजमध्ये नोव्हेंबर १८३४ मध्ये बाळशास्त्री यांची विद्वत्ता पाहून प्राध्यापक म्हणून नियुक्त करण्यात आले. वयाच्या विशीच्या आत ते प्राध्यापक झाले.तेथे असलेल्या सतरा प्राध्यापकांमध्ये ते एकमेव व **पहिले भारतीय प्राध्यापक** होते. ते गणित. खगोलशास्त्र व भाषा शिकवत असत. दादाभाई नौरोजी व गणिताचे प्रकांड पंडित केरूनाना छत्रे हे त्यांचे विद्यार्थी होते. शिक्षणाचा दर्जा तपासण्यासाठी पुणे, ठाणे, सुरत या विभागात मुख्य शाळा तपासनीस (सुपरिंडेंटेंट) नेमले गेले. १८४४ पर्यंत बाळशास्त्री यांनी दक्षिण विभागातील मराठी व कानडी शाळा तपासणीचे काम चार वर्षे केले. मुंबई इलाख्यातील दक्षिण विभागाचे **पहिले मराठी शिक्षणाधिकारी** होण्याचा मान बाळशास्त्रींच्या नावावर नोंदला गेला आहे. १८४५ मध्ये बाळशास्त्री राज्याच्या शिक्षण विभागाचे संचालक झाले.'बोर्ड ऑफ एज्युकेशन'ने चांगले अध्यापक तयार करावेत अशी बाळशास्त्रींनी

मांडलेली **अध्यापक वर्गाची कल्पना** मान्य होऊन १८४५ मध्ये अध्यापक वर्ग सुरु करण्यात आला. त्याचे पहिले संचालक बाळशास्त्रीच होते.

**बाळशास्त्रींचे कार्य / कामगिरी**

**१) विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन**

देशाची प्रगती होण्यासाठी आधुनिक विचार रुजविणे आवश्यक आहे. आपल्या संस्कृतीचा विकास होण्यासाठी वैज्ञानिक ज्ञानाची आपल्याला गरज आहे, शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. केवळ वैद्यानिक ज्ञानच हवे असे नाही तर वैज्ञानिक दृष्टीकोनाची गरज ही त्यांना वाटत होती. सामाजिक धार्मिक सांस्कृतिक घटकाबाबतही वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारता आला पहिजे. ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण होण्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोन व विवेकनिष्ठ भूमिका समाजात रुजविण्यासाठी बाळशास्त्री आग्रही होते.

**२) जुने व नव्याची सांगड**

बाळशास्त्री यांना पाश्चात्यांची प्रगती कौतुकास्पद वाटत होती. आपले ते सर्व चांगले किंवा आपले ते सर्व वाईट अशी टोकाची भूमिका त्यांनी घेतली नव्हती किंवा पाश्चात्य ते सर्व चांगले असून ते सर्व आपण स्वीकारले पाहिजे अशी पश्चात्य अंधभक्तीही ते करत नव्हते. त्यांचे जे चांगले आहे ते आपल्यातील चांगले टिकवून स्वीकारण्यावर त्यांचा भर होता. थोडक्यात जुन्या नव्यातील चांगल्याची सांगड घालण्याची त्यांची भूमिका होती.

**३) प्रबोधनाचे मार्ग**

सार्वजनिक वाचनालयाची आवश्यकता व महत्त्व बाळशास्त्रीयांनी ओळखले होते. समाजामध्ये ज्ञानाच्या प्रसारासाठी ग्रंथालये महत्त्वाची ठरतील व वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी १८४५ मध्ये बॉम्बे नेटीव्ह जनरल लायब्ररी सुरू केली. **ज्ञानाची कवाडे जनसामन्यांसाठी उघडी** केली. भारतीय व्यक्तीने सुरू केलेले ते पहिले वाचनालय होते. लोकांनी आपली मते निर्भीडपणे मांडता यावी. विविध समस्या व मुद्द्यांवर लोकहितासाठी चर्चा व्हावी. संवाद वाढून विचारांची देवाण घेवाण व्हावी यासाठी भारतीयांना एखादे व्यासपीठ उपलब्ध व्हावे ही बाळशास्त्री यांची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी नेटीव्ह इंप्रुव्हमेंट सोसायटी ही संस्था स्थापन केली. असे व्यासपीठ निर्माण करण्यासाठी अशी संघटना स्थापन करण्याचा हा

पहिलाच प्रयोग होता. बाळशास्त्री या सोसायटीचे पहिले अध्यक्ष होते. या संस्थेत उद्दिष्टानुसार विविध विषयांवर निबंध लिहून त्याचे वाचन व चर्चा केली जाई. या संघटनेपासूनच प्रेरणा घेऊन पुढे 'स्ट्युडंट्स लिटररी अॅन्ड सायंटिफिक सोसायटी' ही संस्था स्थापन झाली.

**४) शिक्षण आवश्यकता व सुधारणा -**

उपलब्ध साधनांपैकी शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे हे ओळखणारी किंवा त्याद्वारे कार्य करणारी पहिली व्यक्ती म्हणून अनेक इतिहासकार बाळशास्त्री यांचा उल्लेख करतात. **शिक्षण प्रसाराबरोबर शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावरही त्यांनी भर दिला. त्यांनी मांडलेली अध्यापक विद्यालयाची कल्पना मान्य झाली. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी निवासी शाळा असाव्यात अशी सूचना बाळशास्त्री यांनी केली होती.** तसेच मुंबईसारख्या शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, त्यांचे शीलसंवर्धन व्हावे व त्यांची राहण्याची सोय व्हावी यासाठी बाळशास्त्री यांनी आपल्या घराशेजारीच एक वाडा भाड्याने घेऊन **पहिले विद्यार्थी वसतिगृह** सुरू केले. तेथे ते विद्यार्थ्यांच्या शिस्त, आरोग्य, संस्कार व शिक्षण यांकडे स्वत: लक्ष देत. शिक्षणाशिवाय, विशेषत: पाश्चात्य शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे ओळखून बाळशास्त्रींनी शिक्षणाचा प्रसार व्हावा व शिक्षण दर्जेदार असावे यासाठी प्रयत्न केले.रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेतील पौर्वात्य भाषांचे भाषांतरासाठी असलेलेल्या समितीचे सदस्य म्हणूनही बाळशास्त्रीनी काम (१८३१) केले. रॉयल एशियाटिक सोसायटी च्या कार्यात भाग घेणारे बाळशास्त्री **पहिले भारतीय विद्वान** होते. जिओग्राफिकल सोसायटी मुंबई शाखा सुरू झाली तेव्हा त्याचे **सन्माननीय सदस्यत्व** जांभेकरांना दिले गेले. दर्पण मधूनही बाळशास्त्रींनी शिक्षणाचा पुरस्कार केला व प्रसारासाठी काम केले.

**५) समाज जागृतीचे माध्यम वृत्तपत्र**

बाळशास्त्रीं प्राध्यापक झाले. समाजातील समस्यांनी ते अस्वस्थ होते. गुलामीबरोबरच अनेक अनिष्ट प्रथा व धारणांनी येथील समाज समस्याग्रस्त असल्याने समाजाला यातून बाहेर काढण्यासाठी केवळ महाविद्यालयातून शिकवून चालणार नाही तर संपूर्ण समाजाला शिक्षण देण्याची गरज आहे. त्यासाठी त्यांनी वृत्तपत्र सुरू करण्याचा निर्णय घेतला. याकामी त्यांना रघुनाथ हरिश्चंद्रजी व जनार्दन वासुदेवजी तसेच गोविंद विठ्ठल कुंटे (भाऊ महाजन)यांची मोलाची मदत झाली.

६ जानेवारी १८३२ रोजी मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू झाले. दर्पण अगोदर पाक्षीक होते. ४ मे १८३२ पासून ते साप्ताहिक स्वरूपात प्रकाशित होऊ लागले. २६ जुन १८४0 रोजी दर्पणचा शेवटचा अंक प्रसिद्ध झाला. दर्पण बंद पडले. तेव्हा दर्पणचे ३00 वर्गणीदार होते. दर्पण इंग्रजी व मराठीत प्रकाशित होत असे. शासनाला आवडो न आवडो दर्पणने अनेक सामाजिक प्रश्न हाताळले. अनेक चळवळींना मदत केली. लोकशिक्षण आणि ज्ञानप्रसार हा दर्पणचा खऱ्या अर्थाने उद्देश होता. दर्पण बंद पडले पण समाजजागृतीच्या तळमळीतून बाळशास्त्रींनी १ मे १८४0 पासून दिग्दर्शन नावाचे मासिक सुरू केले. पहिल्या मराठी मासिकाचे जनक ही बाळशास्त्री आहेत. हे मासिक पुढे चार वर्ष चालले. आपल्या लेखणीने बाळशास्त्री यांनी सुधारणांना पाठबळ दिले.

**६) लेखनातून सुधारणेची दिशा -**

बाळशास्त्री अत्यंत विद्वान गृहस्थ होते. त्यांनी आपल्या अल्पआयुष्यात मोठे विद्वत्तापूर्ण लेखन केले. त्यांनी विविध विषयावर लेखन केले आहे. त्यात प्रामुख्याने व्याकरण, इतिहास, भूगोल, गणित, खगोलशास्त्र, मानसशास्त्र या विषयांचा समावेश आहे. त्यांचे लेखन सोप्या सहज ओघवत्या भाषेत असल्याने अवघड क्लिष्ट विषयही वाचकास सहज समजत. ज्ञानाचा प्रसार व सुधारणानुकुल जनमत घडविण्यासाठी त्यांनी आपल्या लेखनकौशल्याचा उपयोग केला.

त्यांनी लिहिलेले ग्रंथ पुढीलप्रमाणे - नीती कथा,,, सारसंग्रह, इंग्लंड देशाची बखर भाग १ व २, बाल व्याकरण, भूगोल विद्या, भूगोलविद्येची मुलतत्त्वे मरे यांच्या इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप, शब्दसिद्धीनिबंध, समीकरणाविषयी टिपणे, शून्यलब्धी गणित व मूलपरिणती गणित, हिंदुस्थानचा इतिहास, इंग्रजी मराठी धातुकोश, पुनर्विवाह प्रकरण, याशिवाय जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख व ताम्रपट यावर शोधनिबंध लिहिले तसेच दर्पण मधून मुलकी व न्याय खात्यातील अधिकाऱ्यांची माहिती तसेच वैज्ञानिक घडामोडी स्त्री शिक्षण विधवा पुनर्विवाह या सामाजिक प्रश्नावर जहाल लिखाण केले. प्रामुख्याने विधवा पुनर्विवाहाची चळवळ त्यांच्या लिखाणामुळे उभी राहिली. असे विपुल व दर्जेदार लेखन बाळशास्त्री यांनी केले.यापैकी भूगोल विद्या व भूगोलविद्येची मुलतत्त्वे ही दोन्ही पुस्तके अनेक वर्षे प्राथमिक शाळेत पाठ्यपुस्तक म्हणून होती. त्यांनीच शिळाप्रेसवर ज्ञानेश्वरी १८४५ मध्ये छापून उपलब्ध करून दिली. बाळशास्त्रीनी अनेक ग्रंथांचा अनुवादही केला. ते भाषातंरकार म्हणूनही प्रसिद्ध होते. दर्पणच्या पहिल्याच अंकात त्यांनी अनुवाद कार्याचे महत्त्व विशद केले आहे. त्यांनी संशोधनपर

लेखनही मोठ्याप्रमाणावर केले. 'एशियाटिक सोसायटी'च्या त्रैमासिकात शोधनिबंध लिहिणारे ते पहिले भारतीय होते.

**७) स्त्री विषयक सुधारणा -**

बाळशास्त्रींनी सुधारणावादी धोरण अंगीकारत आपल्या कौशल्याने लोकशिक्षण आणि ज्ञानप्रसाराचे काम केले. समाजात पसरलेल्या वाईट प्रवृत्तीमुळे समाज मागासलेला राहतो म्हणून लोकशिक्षण (प्रबोधन) व ज्ञानप्रसार आवश्यक ठरतो. स्त्रियांवर लादलेली बंधने, बालविवाह, विधवाविवाह, पारतंत्र्य, केशवपन यांसारख्या गोष्टींमुळे समाजरचना चुकीच्या पायावर उभी आहे . त्यातील दोष काढले नाहीत तर पिढ्यान् पिढ्या ते सर्वांना भोगावे लागेल. त्यातून समाजाचा, धर्माचा, राष्ट्राचा विकास तर होणार नाही, पण शृंखलेमुळे अवनती होईल आणि त्याला पारतंत्र्याचे, गुलामीचे कायम स्वरूप येईल हे जांभेकरांनी 'दर्पण'मधून सांगितले. बाळशास्त्री यांनी बालविवाह, सती प्रथा सारख्या अनिष्ठ प्रथांना विरोध केला. विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. याबाबत महाराष्ट्रात सर्वप्रथम बाळशास्त्री यांनी लेखन केले. विधवांची दयनीय सामाजिक स्थिती लक्षात घेऊन विधवा विवाहासाठी समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी दर्पण वृत्तपत्रातून लेखन केले. अनेक लोकांना या सुधारणाविषयक प्रश्नांवर लेख लिहिण्यास प्रोत्साहन देऊन दर्पणने ते लेख छापले. स्वत: बाळशास्त्री यांनी ऑगस्ट सप्टेंबर १८३२ च्या अंकात याविषयावर तीन लेख लिहिले.विधवाविवाहाचा पुरस्कार करणारे पुस्तक गंगाधरशास्त्री फडके यांना लिहिण्यासही बाळशास्त्री यांनी प्रोत्साहन दिले. बाळशास्त्री व सुधारकांच्या कार्यामुळे पुढे सरकारला विधवा पुनर्विवाहाचा कायदा करता आला. स्त्री सुधारणांसाठी शिक्षणाची आवश्यकता मांडत स्त्री शिक्षणाचा हिरीरीने पुरस्कार केला.

**८) अनिष्ट प्रथांना विरोध -**

समाजातील जुनाट चालीरीती दूर करून अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले. अंधगुरूभक्ती, वाढते कर्मकांड, जन्मावरून श्रेष्ठ कनिष्ठता, जातिभेद याविरोधात त्यांनी लेखन करत जागृती घडविली. दर्पण बंद झाल्यांनतरही इतर माध्यमातून बाळशास्त्री यांचे सामाजिक प्रबोधनाचे कार्य सुरु राहिले. महाराष्ट्रात प्रबोधनाचे चैतन्य निर्माण करण्याचे काम बाळशास्त्री यांनी केले. धार्मिक सामाजिक व मानवतावादी सुधारणांचा त्यांनी पुरस्कार केला. सुधारणांच्या बाबतीत बाळशास्त्री क्रांतिकारी नव्हे तर उत्क्रांतीवादी होते. त्यांना लोकांना झेपेल या

वेगाने सुधारणा करावयाच्या होत्या. सुधारणा धर्माशी जुळवून करावयाच्या होत्या उदारमतवादी व प्रत्यक्ष सुधारणेला त्यांनी पाठींबा दिला.

### **९) धर्मांतर व शुद्धीकरण -**

बाळशास्त्री हिंदुधर्माभिमानी असले तरी सुधारणावादी होते त्यांनी केवळ विचार मांडले नाहीत तर विचारांच्या मागे कितीही विरोध झाला तर ते ठामपणे उभे राहिले. इंग्रजी राज्याबरोबर आलेल्या धर्म आणि संस्कृतीतील दोषांवर बाळशास्त्री यांनी टिका केली. पाश्चात्य विद्येचा आदर करताना संस्कृतीचा जसाच्या तसा स्वीकार करण्यास त्याचा विरोध होता.मिशनऱ्यांच्या धर्मांतर घडवून आणण्याच्या प्रयत्नांना त्यांचा विरोध होता. त्यामुळे धर्मांतरितांचे शुद्धीकरण करून त्यांना मूळ धर्मात परत घेण्याचे कार्य त्यांनी केले. याकाळात शेषाद्री प्रकरण फार गाजले. ख्रिश्चन घरात राहिल्यामुळे वाळीत टाकण्यात आलेल्या देशस्थ ब्राह्मण श्रीपती शेषाद्री यांना विरोध डावलून स्वधर्मात आणण्याची व्यवस्था त्यांनी केली. बाळशास्त्री यांनी शेषाद्रीस पुन्हा हिंदू धर्मात आणण्यासाठी लढा दिला. न्यायालयात जाऊन शेषाद्रीना न्याय मिळवून दिला. त्यामुळे त्यांना सामाजिक व धार्मिक रोषाला सामोरे जावे लागले. धार्मिक बहिष्कारही सहन करावा लागला. परंतु कायदेशीर आणि संमत मार्गाने लढा देता येऊ शकतो आणि न्याय मिळवता येतो याचा पाया त्यांनी भारतात घातला. धार्मिक शिक्षणातही सरकारने हस्तक्षेप करू नये अशी भूमिका त्यांनी स्वीकारली.

### **१०) सुधारकांची पिढी / परंपरा -**

बाळशास्त्री यांनी सुधारकांची एक पिढी निर्माण केली. बाळशास्त्री यांनी अनेक लोक घडविले. बाळशास्त्री यांच्या शिष्यात दादाभाई नौरोजी, डॉ भाऊदाजी लाड, विश्वनाथ नारायण मंडलिक, डॉ आत्माराम पांडुरंग, केरूनाना छत्रे यांचा समावेश होतो. बाळशास्त्री यांच्या शिष्यांनी सुधारणा चळवळ अधिक व्यापक करत तिचा मोठा प्रादेशिक विस्तारही घडवून आणला.

### **समारोप**

बाळशास्त्री यांना अल्पआयुष्य मिळाले. वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी १७ मे १८४६ रोजी बाळशास्त्रींचा मुंबई येथे विषमज्वराने मृत्यू झाला. त्यानंतर न्यायमूर्ती सर अस्थिकन पेरी यांनी म्हटले की, 'बाळशास्त्री यांच्या दु:खद मृत्यूने पश्चिम भारतावर जेवढी महान आपत्ती ओढवली आहे, तेवढी आपत्ती मुंबईतील कोणाही पुरुषाच्या मृत्यूने मग तो युरोपीयन असो की एतद्देशीय

असो अथवा तो कितीही मोठ्या दर्जाचा असो - ओढवणार नाही.' यावरून बाळशास्त्री यांच्या कार्याचा व्यापक पट लक्षात येतो. बाळशास्त्री यांचे एकूणच जीवन अतिशय प्रेरणादायी आणि दीपस्तंभासारखे होते.

मराठीतल्या पहिल्या वृत्तपत्राबरोबरच अनेक पदे मराठी माणसाने त्यांच्या रूपाने पहिल्यांदा भूषविली आहेत. अशा या शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे अग्रदुत बाळशास्त्रींचा मृत्यू अकाली झाला. आपल्या छोटयाशा जीवनकाळात बाळशास्त्रींनी विविध क्षेत्रात फार मोलाची कामगिरी केली आहे. अनेक भाषा पत्रकारिता निबंधलेखन अध्यापन इतिहास संशोधन ग्रंथलेखन सामाजिक कार्य विविध संस्थांचे संस्थापक अशा विविध क्षेत्रात कार्य . त्यांच्या कार्याचा ठसा उमटला.

१९ व्या शतकातील आद्य समाजसुधारक, महाराष्ट्रात प्रबोधनाची खऱ्या अर्थाने सुरुवात करणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व, ज्यांच्या कार्यामुळे येथे सामाजिक, शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील सुधारणांना सुरुवात झाली असे बाळशास्त्री यांच्याबद्दल अनेक विद्वानांनी वेळोवेळी गौरोद्गर काढले आहेत. न्यायमूर्ती चंदावरकर  बाळशास्त्री यांचा उल्लेख **पश्चिम भारतातील आद्यऋषी** तर प्र.के.अत्रे **राष्ट्रजागृतीचे अग्रदूत** म्हणून करतात. भारताचे पितामह आणि बाळशास्त्री यांचे विद्यार्थी दादाभाई नौरोजी त्यांचा उल्लेख **अद्वितीय विद्वान व प्रख्यात पंडित** असा करतात. बाळशास्त्री यांच्या चरित्रकार नीला उपाध्ये त्यांच्या इतिहास लेखनातील योगदानामुळे त्यांना  **भारतीय इतिहास संशोधनाचे जनक** मानतात.

बाळशास्त्री यांनी केलेल्या या वैविध्यपूर्ण कार्याचा गौरव वेळोवेळी विद्वान, विविध संस्था व शासन यांनी केला आहे.प्रकांड पंडित अशी ओळख असलेल्या बाळशास्त्रींच्या कार्याची दखल शासनानेही घेतली. गव्हर्नर सर जेम्स कर्नाक यांनी १८४० मध्ये त्यांना **जस्टीस ऑफ द पिस** हा किताब दिला होता. त्यामुळे त्यांना हायकोर्टात ग्रँड ज्युरी मध्ये बसण्याचा अधिकार मिळाला होता. असा मान मिळणारे ते पहिले भारतीय होते. स्वातंत्र्योत्तर काळातही शासनाने त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून पोस्टाचा विशेष लिफाफा काढून त्यांचा गौरव केला आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या निर्माणात बाळशास्त्री यांचे अनन्यसाधारण योगदान असल्याने त्यांचा **आधुनिक महाराष्ट्राचे जनक** म्हणून उल्लेख केला जातो.